


मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मायेची उब आणि तत्त्वमची आपुलकीची साथ

## सागर बोकेफोडेंचा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसोबत वाढदिवस; जपली सामाजिक बांधिलकी

» पिंपरी | प्रतिनिधी

**वाढदिवसानिमित्त होणाऱ्या झगमगाटाच्या पार्ट्या आणि अनावश्यक खर्चाला फाटा देत उद्योजक सागर बोकेफोडे यांनी सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श घालून दिला आहे. तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या अविरत सामाजिक कार्यापासून प्रेरणा घेऊन त्यांनी आपला वाढदिवस कान्हे येथील किनारा वृद्धाश्रमातील निराधार आजी-आजोबांच्या सहवासात सेवाकार्य करत साजरा केला.**



वृद्धापकाळ हा मानवी आयुष्याचा असा नाजूक टप्पा असतो जिथे माणसाला उपचारांपेक्षाही प्रेम, आदर आणि मायेच्या शब्दांची खरी गरज असते. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या पवित्र भावनेतून सागर बोकेफोडे आणि तत्त्वम सोशल फाउंडेशनने किनारा वृद्धाश्रमातील ज्येष्ठांशी संवाद साधून त्यांच्या चेहऱ्यावर सुखाचे हास्य फुलवले, ज्यामुळे अनेक आजी-आजोबांचे डोळे मायेने पाणावले.

या वेळी आश्रमातील वृद्धांना थंडीपासून संरक्षणासाठी उबदार ब्लँकेट्स तसेच पौष्टिक व आवडीच्या अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम केवळ ब्लँकेट वाटपापुरता मर्यादित न राहता मायेची पांघरूण घालणारा ठरला. वयाने थकलेल्या हातांना जेव्हा आपुलकीची साथ मिळते तेव्हा जगण्याचे बळ अधिक वाढते, याची प्रचिती या भेटीदरम्यान आली. उपस्थित मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी प्रत्येक ज्येष्ठाजवळ बसून त्यांच्या सुख-दुःखाची आत्मीयतेने विचारपूस केली. थंडीच्या दिवसांत ब्लँकेटची मिळालेली ऊब आणि संवादातून मिळालेली मनाची तृप्ती यामुळे हा क्षण आदरयुक्त ऋणानुबंधाचा ठरला. वाढत्या वयात हक्काच्या माणसांची सोबत सुटलेल्या या निराधारांना 'कोणीतरी आपली काळजी घेणारे आहे' हा नवसंजीवनी देणारा विश्वास या उपक्रमामुळे लाभला.

एका बाजूला तरुणाईची सामाजिक जाणीव आणि दुसऱ्या बाजूला ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यातील कृतज्ञतेचे भाव, असा दोन पिढ्यांना जोडणारा भावूक संगम या प्रसंगी पाहायला मिळाला. वाढदिवसावर अनाठायी खर्च करण्यापेक्षा या ज्येष्ठ माऊलींच्या चेहऱ्यावरील हसू आणि समाधान हाच माझ्यासाठी सर्वोत्तम आशीर्वाद असल्याचे भावोद्गार सागर बोकेफोडे यांनी काढले. तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांच्या पाठीशी उभे राहण्याचा संकल्प कायम राहील, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. या सेवाकार्याप्रसंगी तत्त्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर,



सचिव वंदना चौहान, खजिनदार मनीषा थोरात-पिसाळ, सदस्य आयुष चौहान, संदीप पिसाळ, रवींद्र लंघे, कैलास कोकाटे यांच्यासह उद्योजक सागर बोकेफोडे यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. दिखाऊपणाच्या काळात सामाजिक भान जपत साजरा झालेला हा वाढदिवस उपस्थितांच्या मनाला थेट स्पर्शून गेला.

# विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेश विसर्जन घाट सज्ज

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, या भक्तीसोबत पर्यावरणाचे रक्षण आणि सामाजिक बांधिलकी जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच सामाजिक आणि पर्यावरणपूरक विचारातून विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशन यांच्या वतीने वाकड येथे पर्यावरणपूरक श्री गणेश विसर्जन घाट २०२६ उभारण्यात आला आहे.**



> गणरायावरील आपली श्रद्धा ही केवळ उत्सवापुरती मर्यादित न राहता ती समाज आणि पर्यावरणाप्रतीच्या आपल्या जबाबदारीतूनही दिसली पाहिजे. भक्ती जपत पर्यावरणाचे रक्षण आणि मूर्तीदानातून गरजू मुलांच्या शिक्षणाला हातभार, हा संदेश घेऊन विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे. पिंपरी चिंचवड शहर आणि वाकड परिसरातील प्रत्येक गणेशभक्ताने या उपक्रमात सहभागी होऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळ अधिक व्यापक करावी.
>
> \- विशाल वाकडकर, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, शरदचंद्र पवार.

द्रौपदा मंगल कार्यालयाजवळ, कस्तुरी चौक, हिंजवडी रोड, वाकड येथे उभारण्यात आलेला हा घाट १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते रात्री १० या वेळेत गणेशभक्तांसाठी उपलब्ध राहणार आहे.

या घाटावर ५ फूट उंचीपर्यंतच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाची तसेच मूर्तीदानाची सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नदी, नाले, ओढे व विहिरी यामध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन होऊन जलस्रोतांचे प्रदूषण होऊ नये, तसेच पर्यावरणाची हानी टाळता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घाटावर विसर्जित अथवा दान केलेल्या गणेशमूर्तींचे श्री फाऊंडेशन पुणे या संस्थेमार्फत संकलन करण्यात येणार आहे. या मूर्तींचे पुनःशृंगार करून त्यांचा योग्य पद्धतीने उपयोग केला जाणार आहे.

तसेच मूर्तीदान योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीद्वारे अनाथ मुलांच्या शिक्षणासह त्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी मदत केली जाणार आहे. त्यामुळे एका गणेशमूर्तीच्या विसर्जनातून पर्यावरणाचे संवर्धन आणि समाजातील गरजू मुलांच्या भविष्यासाठी मदत, असा दुहेरी सामाजिक संदेश या उपक्रमातून दिला जात आहे.

घाटावर भाविकांसाठी आरती व्यवस्था, निर्माल्य कुंड, प्रकाश व्यवस्था यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

वाकड, पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील नागरिकांनी आपल्या घरगुती, सोसायटीतील तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या शाडू मातीच्या आणि POPच्या गणेशमूर्तींचे विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने याच घाटावर करावे, असे आवाहन विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी गुलाल व रंगांचा वापर टाळावा, निर्माल्य केवळ निर्माल्य कुंडात जमा करावे आणि प्लास्टिकचा वापर टाळून स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह

## महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी नियोजन बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

**मराठी भाषेला केंद्र शासनाने दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा दिला. या ऐतिहासिक निर्णयाच्या पार्श्वभूमीवर दि. ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' आणि दि. ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा करण्याचे राज्य शासनाने निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सर्वव्यापी विविध कार्यक्रम उपक्रम आयोजित करण्याचे प्रयोजन असून त्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या विशेष उपस्थितीत मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.**





महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात होणाऱ्या या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्राचा समृद्ध भाषिक व सांस्कृतिक वारसा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यादृष्टीने मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार व प्रसार करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने दि. ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' आणि दि. ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून व्यापक स्वरुपात साजरा करण्यासाठी महापालिकेच्यावतीने विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्याचे प्रयोजन आहे.

या उपक्रमांचे स्वरूप, रूपरेषा, व्याप्ती आणि विविध कार्यक्रमांबाबत सर्वंकष चर्चा करण्यासाठी नियोजन बैठक घेण्यात येणार आहे.

या बैठकीस मराठी भाषेवर प्रेम करणारे साहित्यिक, मराठी भाषा संवर्धक, मराठी भाषा प्रचारक, मराठी भाषेचे जतन संवर्धन करणाऱ्या कला, साहित्य व सांस्कृतिकसह सर्व क्षेत्रातील विविध संस्था, व्यक्ती व प्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना व संकल्पना मांडाव्यात, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

अभिजात मराठी भाषा दिवस व सप्ताह शहरात व्यापक स्वरूपात साजरा करून मराठी भाषेचा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासह मराठी भाषेच्या प्रचार, प्रसार व संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी दिली आहे.

# महापालिकेने घनकचरा व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणासाठी जागा केल्या प्रस्तावित

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि विकेंद्रित पद्धतीने करण्यासाठी महानगरपालिकेने विविध भागांतील जागा प्रस्तावित केल्या आहेत. मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचा वाढता भार लक्षात घेता, प्रभाग स्तरावर घनकचरा व्यवस्थापनाची यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.**

मोशी कचरा डेपो येथे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध जागा अपुरी पडत असल्याने शहरातील विविध भागांतून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रभागनिहाय विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या आरक्षित जागांची स्थळपाहणी करण्यात आली असून, प्राथमिक स्तरावर काही जागा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

प्रस्तावित जागांवर त्यांच्या क्षेत्रफळानुसार विविध प्रकारच्या घनकचरा प्रक्रिया सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, ऊर्जा निर्मिती, जैविक कचऱ्यापासून बायोगॅस व बायोफ्युएल निर्मिती तसेच प्लास्टिक कचऱ्यापासून विविध उत्पादने तयार करण्याच्या सुविधांचा समावेश असेल.

सदर जागांची तांत्रिक योग्यता, उपलब्ध क्षेत्रफळ, वाहतूक व्यवस्था, पर्यावरणीय बाबी आणि इतर आवश्यक निकषांची तपासणी सुरू आहे. संबंधित सर्व बाबींचा अभ्यास करून तसेच आवश्यक त्या संमती व मान्यता प्राप्त करून अंतिम जागा निश्चित करण्यात येणार आहेत.

या विकेंद्रित व्यवस्थेमुळे कचऱ्याची वाहतूक अधिक कार्यक्षम होण्यास, मोशी कचरा डेपोवरील भार कमी करण्यास तसेच शहरातील घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावण्यास मदत होणार आहे.



> पिंपरी चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विकेंद्रीकरणावर भर देण्यात येत आहे. मोशी डेपोवरील कचऱ्याचा भार कमी करण्यासोबतच कचऱ्याचे संकलन, वाहतूक, वर्गीकरण आणि प्रक्रिया अधिक कार्यक्षम पद्धतीने करण्याचे नियोजन आहे. प्रस्तावित जागांची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करून या जागांची अंतिम निश्चिती महापौर, सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व नगरसदस्य यांच्या संमतीने केली जाणार आहे. पर्यावरणपूरक आणि नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, अशा पद्धतीने या प्रकल्पांची उभारणी करण्यात येईल.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

### प्रस्तावित करण्यात आलेल्या जागा

- प्रभाग क्रमांक १३ मधील सेक्टर क्रमांक २२ येथे पाण्याच्या टाकीजवळ
- प्रभाग क्रमांक १७, चिंचवड, आरक्षण क्र. १/८९, सर्व्हे नं. ११३, ११४ व ११६ पैकी
- प्रभाग क्रमांक १८, चिंचवड, आरक्षण क्र. २२१
- प्रभाग क्रमांक १०, दत्तनगर, राम मंदिराजवळ
- सर्व्हे नं. ७७, दिघी गायरान
- चोविसावाडी, आरक्षण क्र. २/१६
- पुनावळे, सर्व्हे नं. २३/६/३ पै., २३/६/२ पै., २३/५ पै., २३/१ पै., २३/६/४ पै., २३/२/१ पै. व २३/२/२
- पुनावळे, सर्व्हे नं. २६/१/६, २६/३/१ व २६/३/२ पै. गवळीमाथा
- खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील जागेबाबत सकारात्मक चर्चा सुरू आहे.

> प्रस्तावित जागांच्या क्षेत्रफळानुसार तेथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दुर्गंधविरहित ट्रान्स्फर स्टेशन, मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी (MRF), बायोगॅस, बायोफ्युएल तसेच प्लास्टिकपासून उपयुक्त उत्पादने तयार करण्यासंदर्भातील विविध प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. प्रत्येक जागेची तांत्रिक व व्यवहार्यता तपासणी सुरू असून सर्व संबंधित बाबींचा विचार करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.
>
> **- विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# महापालिका आयुक्त रस्त्यावर उतरतात तेव्हा!

## येरवडा परिसराची पाहणी; प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे शहरातील विविध भागातील विकासकामे प्रलंबित असून वारंवार सांगूनही महापालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आल्याचा आरोप नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत केला होता. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत सभासदांनी कडक शब्दात सुनावले होते.**

या पार्श्वभूमीवर आता महापालिका आयुक्त सक्रिय झाले असून रस्त्यावर उतरून विविध भागात पाहणी करण्यास आयुक्त नवल किशोर राम यांनी सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून आयुक्त राम यांनी येरवडा क्षेत्रीय कार्यालय परिसरातील रखडलेली विकासकामे, मिसिंग लिंक, भूसंपादन आणि स्वच्छतेच्या कामांची पाहणी केली. यामुळे या रखडलेल्या कामांना आता गती मिळणार आहे. या परिसरातील विविध विकासकामांची पाहणी करत प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचा आदेश आयुक्त राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

शहरातील विविध भागातील विकासकामे रखडलेली असून महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नगरसेवकांकडून केला जातो. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत देखील सभासदांकडून रखडलेल्या कामाबाबत विचारणा करण्यात आली. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त राम यांनी विविध क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन तेथील कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.

येरवडा क्षेत्रीय कार्यालय परिसरातील सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांचा शनिवारी आढावा घेण्यात आला. रस्ते दुरुस्ती, देखभाल, वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मिसिंग लिंक, भूसंपादन आणि नागरिकांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची माहिती त्यांनी घेतली. यावेळी उपायुक्त आशा राऊत, घनकचरा विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे, पथ विभागाचे अधीक्षक अभियंता रोहिदास गव्हाणे आदी उपस्थित होते.



### 'मिसिंग लिंक'ला भूसंपादनाचा अडथळा

शिवणे–खराडी नदीकाठच्या रस्त्यावरील मिसिंग लिंक, ग्रँट रोड-नगर रस्त्यावरील जंक्शनजवळील रस्ता रुंदीकरण, वडगावशेरी नदीकाठच्या रस्त्यावरील मिसिंग लिंक आणि वाघोलीतील प्रस्तावित १८ मीटर रुंदीच्या उत्तर-दक्षिण रस्त्याच्या मिसिंग लिंक कामाची माहिती यावेळी आयुक्तांनी घेतली. काही प्रकल्प भूसंपादनाच्या अडचणींमुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या प्रमुख रस्ते आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांचे भूसंपादन तातडीने पूर्ण करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले.

### हरित जागांचा विस्तार करण्याच्या सूचना

वाघोली परिसरातील नाला गार्डनची पाहणी करताना आयुक्तांनी नैसर्गिक घटकांचा योग्य वापर करून विकसित केलेल्या जागेचे कौतुक केले. महापालिकेच्या उपलब्ध जागांचा योग्य वापर करून नागरिकांसाठी अशाच हरित जागा विकसित करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. अशा जागा शहराच्या पर्यावरणीय समतोलासाठी 'शहराची फुफ्फुसे' म्हणून महत्त्वपूर्ण ठरू शकतात, असे आयुक्तांनी नमूद केले.

# काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट; पिंपरीत थारवर पोलिसांचा दणका!

**» पुणे | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मार्केट यार्डातील फूल बाजारात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर फुले विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली आहे. किरकोळ बाजारातील विक्रेते, पुष्प सजावटकारांकडून फुलांना मागणी वाढली असून, सर्व प्रकारच्या फुलांचे दर तेजीत आहेत. गुलछडी, शेवंतीच्या दरात दुपटीने वाढ झाली आहे.**

'गणेशोत्सवात फुलांना चांगले दर मिळत असल्याने शेतकरी चांगल्या प्रतीची फुले राखून ठेवतात. मार्केट यार्डातील फूल बाजारात सोलापूर, वाई, सातारा, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर फुले विक्रीस पाठविली आहेत. कर्नाटकातून मारिगोल्ड जातीच्या शेवंतीची आवक झाली आहे. पुणे जिल्ह्यातील यवत, लोणी काळभोर भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर फुलांची लागवड करतात,' अशी माहिती फूल बाजारातील व्यापारी अखिल फूल बाजार अडते संघटनेचे समन्वयक सागर भोसले यांनी दिली.

ते म्हणाले, 'उत्सवाच्या काळात फुलांना मागणी राहील. दरही तेजीत असतील. झेंडू, शेवंतीला सर्वाधिक मागणी आहे. सार्वजनिक मंडळांचे मंडप, रथ सजावटीसाठी फुलांचा वापर केला जातो. गुलाब, जास्वंदाला मागणी वाढली आहे. पूजेसाठी जास्वंद, मोगऱ्याला मागणी वाढली आहे.'



### मुंबई, कोकण, गोव्यातून खरेदी

'मुंबईतील दादर येथील फूलबाजार, गोवा, कोकणातील फूल विक्रेत्यांनी पुण्यातील फूल बाजारातून मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू केली आहे. गणेशोत्सवात फुलांना चांगले दर मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे,' असे सागर भोसले यांनी नमूद केले.

### घाऊक बाजारातील फुलांचे किलोचे दर (रुपयांत)

झेंडू : ३० ते ४०, गुलछडी : ३०० ते ४००, ॲस्टर गड्डी : १० ते २०, सुट्टा : १०० ते १५०, शेवंती : ५० ते १२०, गुलाब गड्डी : २० ते ४०, गुलछडी काडी : ३० ते ८०, डच गुलाब (२० नग) : ६० ते ५०, जर्बेरा : ८० ते १००, कार्नेशिअन : १५० ते २५० रुपये, शेवंती काडी : १५० ते २५०, लिलियम (१० नग) : ८०० ते १५००, ऑर्किड : ४०० ते ६००, जिप्सेफिला : १५० ते २५०, लिली बंडल : १० ते १५, जुई : ७०० ते ८००

# आरएमसी प्रकल्पांवर प्रदूषण मंडळाचा कारवाईचा दणका!

## पुणे, सातारा, सोलापुरातील २१ प्रकल्प बंद; नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा कायम

**पुणे | प्रतिनिधी**

**गृहनिर्माण क्षेत्राचा वेगाने विस्तार होत असताना रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी वाढल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गेल्या वर्षी त्यांच्यासाठी नवीन नियमावली लागू केली. या नवीन नियमावलीचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर मंडळाने आता थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. मंडळाकडून पुण्यासह सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत २१ 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्यात आले आहेत. यापुढील काळातही ही धडक कारवाई सुरु राहणार आहे.**




'आरएमसी' प्रकल्पांमुळे होत असलेल्या हवा प्रदूषणाचा मुद्दा वारंवार उपस्थित होत आहे. काही ठिकाणी नागरिकांनी रस्त्यावर उतरून 'आरएमसी' प्रकल्पांविरोधात आंदोलन केल्याने त्याची तीव्रता समोर आली. यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्पांसाठी नवीन नियमावली गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये लागू केली. मात्र, या नियमावलीच्या अंमलबजावणीत 'आरएमसी' प्रकल्पांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सहकार्य मिळत नव्हते. त्याच्यामुळे ही अंमलबजावणी लांबणीवर पडली होती. अखेर हा तिढा सुटल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्पांना नवीन निमयावलीचे पालन करण्याच्या सूचना केल्या.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्पांकडून नवीन नियमावलीचे पालन होते की नाही, हे तपासण्याची मोहीम जानेवारी महिन्यापासून सुरू केली. मंडळाने पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यात ही मोहीम राबविली. यात एकूण २१ 'आरएमसी' प्रकल्पांकडून नियमभंग झाल्याचे समोर आले. त्यानंतर या प्रकल्पांना नियमांचे पालन करण्यास मुदत देऊनही त्यांनी हे करण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे मंडळाने अखेर हे 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्याचे पाऊल उचलले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्याची कारवाई करूनही ते सुरूच राहत असल्याचे प्रकार घडत आहेत. काही प्रकल्पांचा वीजपुरवठा बंद करण्यात आल्यानंतर ते जनित्रावर सुरू ठेवले जातात. याच वेळी पाणीपुरवठा बंद करण्यात आलेल्या प्रकल्पांकडून टँकरचे पाणी वापरण्याची पळवाट शोधली जाते. त्यामुळे असे बेकायदा सुरू असलेले प्रकल्प शोधून ते लाखबंद करण्याचे पाऊल मंडळाने महसूल विभाग, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांच्या मदतीने उचलले जाते, असे मंडळातील सूत्रांनी सांगितले.

### कठोर कारवाई करणार

'आरएमसी' प्रकल्पांमुळे प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी मंडळाकडे येत आहेत. या प्रकल्पांसाठी नवीन नियमावली लागू करण्यात आली आहे. या नियमावलीचे पालन करणारे २१ आरएमसी प्रकल्प बंद करण्याची कारवाई करण्यात आली. मंडळाकडून 'आरएमसी' प्रकल्पांची तपासणी सातत्याने सुरू असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे यांनी दिली.

# कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ परिसरातील जमिनीचा ताबा जमादार कुटुंबाकडेच

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील हवेली तालुक्यातील पेरणे येथील ऐतिहासिक 'जयस्तंभ' आणि लगतच्या सुमारे ९.२५ एकर जमिनीचा ताबा जमादार-माळवदकर कुटुंबाकडेच कायम ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निकाल पुणे दिवाणी न्यायालयाने दिला आहे. कायदेशीर प्रक्रियेशिवाय या कुटुंबाचा ताबा हिरावून घेण्यास किंवा त्यांना बेदखल करण्यास न्यायालयाने राज्य शासनाला कायमस्वरूपी मनाई केली आहे. संयुक्त दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमोल शिंदे यांनी शुक्रवारी यासंदर्भातील आदेश जारी केले.**




ऐतिहासिक नोंदींनुसार, १ जानेवारी १८१८ रोजी झालेल्या भीमा कोरेगावच्या लढाईत पेशव्यांविरुद्ध लढलेल्या आपल्या सैनिकांच्या स्मरणार्थ ब्रिटिश सरकारने १८२२ मध्ये या 'जयस्तंभा'ची उभारणी केली होती. या लढाईत जखमी झालेले ब्रिटिश सैनिक खंडोजीबीन गजोजी जमादार यांची १३ डिसेंबर १८२४ रोजी ब्रिटिश सरकारने जयस्तंभाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली होती.

ब्रिटिशांनी त्यांना एक सनद बहाल करून, जोपर्यंत कुटुंबात पुरुष वारसदार आहेत, तोपर्यंत जयस्तंभासह सुमारे २६० एकर जमिनीचा ताबा जमादार कुटुंबाकडे दिला होता. खंडोजींचे सहावे वंशज आणि भारतीय लष्करातून निवृत्त झालेले कॅप्टन बाळासाहेब जमादार-माळवदकर यांनी या सनदेची मूळ प्रत व अन्य पुरावे न्यायालयात सादर केले होते.

सप्टेंबर २०१५ मध्ये 'भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण आणि संवर्धन समिती' या खासगी संस्थेने तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांना पत्र लिहिले होते. जयस्तंभाच्या लगतच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर जमादार कुटुंबाचे नाव 'बेकायदेशीरपणे' नोंदवले गेले असल्याचा आरोप समितीने केला. सातबारा उतारावरून कुटुंबाचे नाव काढावे तसेच या जागेवरील अतिक्रमण हटवावे, अशी मागणी समितीने केली होती.

दरवर्षी १ जानेवारीला येथे जमणाऱ्या लाखो आंबेडकरी अनुयायांना अपुऱ्या जागेमुळे अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही समितीने नमूद केले होते.

मंत्र्यांच्या निर्देशानंतर तत्कालीन समाजकल्याण विभाग, 'बार्टी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) आणि जिल्हा प्रशासनाकडून कुटुंबाची घरे, शेड आणि शेतमाल हटवण्याच्या हालचाली सुरू झाल्या. या कारवाईविरोधात कॅप्टन बाळासाहेब जमादार, नामदेव जमादार आणि अशोक जमादार यांनी एप्रिल २०१७ मध्ये राज्य शासन, बार्टी आणि समितीविरोधात दिवाणी न्यायालयात दावा दाखल करून कायमस्वरूपी मनाईहुकुमाची मागणी केली होती. दरम्यान, २०२१ मध्ये नामदेव जमादार यांचे निधन झाले.